जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/३६३४/२०२२

वाहतूक नियंत्रण अधिसुचना दिनांक - ०५/०९/२०२२

तळेगाव वाहतुक विभागाचे हद्दीत तळेगाव शहर व लगतचे परिसारातील गणेशमंडळाचे दिनांक ६/०९/२०२२ रोजी विसर्जन मिरवणुक असल्याने तळेगाव चाकण रोडवर मोठ्या प्रमाणात गर्दी तसेच वाहतुक कोंडी निर्माण होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असते.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी आनंद भोईटे, पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिपंरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

## तळेगाव / चाकण वाहतूक विभाग

१. तळेगाव ते चाकण रोडवर सर्व प्रकारच्या जड - अवजड वाहनांना प्रवेश बंदी

- पर्यायी मार्ग- तळेगाव एमआयडीसी फाटा- नवलाख उंब्रे- शिंदेवासुली आंबेठाण चौकी मार्गे इच्छितस्थळी जातील.

२. चाकण ते तळेगाव रोडवर सर्व प्रकारच्या जड- अवजड वाहनांना प्रवेश बंदी

- पर्यायी मार्ग- चाकण-आंबेठाण चौक – शिंदेवासुली- नवलाख उंब्रे – तळेगाव एमआयडीसी फाटा मार्गे इच्छितस्थळी जातील.

तरी तळेगाव वाहतुक विभागाचे हद्दीत दिनांक ०६/०९/२०२२ रोजी १४.०० ते दिनांक ०७/०९/२०२२ रोजी पहाटे ०२.०० वा. पर्यंत वरील प्रमाणे वाहतुक वळविण्यात येत असुन नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा.

(आनंद भोईटे)
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून सदरची बातमी वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी, तळेगाव, चाकण वाहतुक विभाग

४) कार्यकारी अभियंता, सबंधीत प्रभाग, पिंपरी चिंचवड

/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned with CamScanner